महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण, २०१२ नुसार राज्यातील आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पदक प्राप्त खेळाडू आणि त्यांचे क्रीडा मार्गदर्शक यांना रोख बक्षिस देवून गौरविण्याची योजना.

**महाराष्ट्र शासन**

**क्रीडा विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : SD-१२०१९/१/२०२५(१३९५२३५)/क्रीयुसे-२,**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,

दिनांक : १७ सप्टेंबर, २०२६

वाचा :-

१. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक- क्रीडाधो-२०११/प्र.क्र.५५/११/क्रीयुसे-१, दि.१४ जून, २०१२
२. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक-क्रीडाधो-२०१२/प्र.क्र.१५८/१२/क्रीयुसे-२, दि.०५ फेब्रुवारी, २०१४
३. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक- राक्रीधो-२०१८/प्र.क्र. १०३/क्रीयुसे-२, दि.११ ऑक्टोबर, २०१८
४. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक- राक्रीधो-१२२२ /प्र.क्र.११५/क्रीयुसे-२, दि.१५ नोव्हेंबर, २०२२
५. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक- राक्रीधो-३६२२ /प्र.क्र.५९/क्रीयुसे-२, दि.२० ऑक्टोबर, २०२३
६. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक- राक्रीधो-२०२४ /प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दि.०१ जुलै, २०२४
७. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक- राक्रीधो-३६२२ /प्र.क्र.५९/क्रीयुसे-२, दि.०७ ऑक्टोबर, २०२४ व दि.१५ ऑक्टोबर, २०२४
८. मा .उपमुख्यमंत्री तथा मंत्री क्रीडा व युवक कल्याण यांच्या अध्यक्षतेखालील दि.३० सप्टेंबर,२०२६ रोजीची बैठक.
९. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय यांचे क्र.रोख पारितो/धोरण/२०२५-२६/का-६, दि.१७.१०.२०२५ व दि.१६.१२.२०२५ रोजीचे पत्र.
१०.मा. उपमुख्यमंत्री तथा मंत्री क्रीडा व युवक कल्याण यांच्या अध्यक्षतेखालील दि.१३ मे,२०२६ रोजीची बैठक.
११.आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय यांचे क्र.रोख पारितो/धोरण/२०२५-२६/का-/६, दि.१६.०६.२०२६ रोजीचे पत्र.
१२.मा.मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखालील बैठक दि.१२.०८.२०२६.
१३.आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय यांचे क्र.रोख पारितो/धोरण/२०२५-२६/का-/६/२५३८, दि.१४.०८.२०२६ रोजीचे पत्र.

**<u>प्रस्तावना</u> :-**

राज्यातील क्रीडा संस्कृतीचे संवर्धन, प्रचार, प्रसार व जोपासना करण्यासाठी पोषक वातावरण असणे आवश्यक आहे. याच भूमिकेतून राज्याचे क्रीडा धोरण, २०१२ घोषित करण्यात आले असून, त्याची अंमलबजावणी करण्यास संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. राज्याच्या -क्रीडा धोरण, २०१२ अंतर्गत, आंतरराष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करून राज्याचे नाव उज्ज्वल करणाऱ्या खेळाडूंना व त्यांच्या मार्गदर्शकांना रोख पारितोषिके देऊन गौरविण्याची योजना दि.०५.०२.२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये कार्यान्वित करण्यात आली आहे. त्यामध्ये दि.११.१०.२०१८, दिनांक ०७ ऑक्टोबर, २०२४ व दि.१५ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये पुरस्काराचे स्वरुप तसेच पात्रतेच्या निकषामध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे. तसेच राष्ट्रीय स्पर्धेतील पदक प्राप्त खेळाडूंना व मार्गदर्शकांना रोख पारितोषिके देण्यासंदर्भात शासन निर्णय दि.०८.०१.२०१८ अन्वये तरतूद करण्यात आली आहे. त्यामध्ये रोख पारितोषिकाच्या रक्कमेत दि.१५.११.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयान्वये राज्याचे नाव उज्ज्वल केलेल्या राज्यातील खेळाडूंना व त्यांच्या मार्गदर्शकांना प्रोत्साहनपर बक्षिसे देऊन त्यांचा गौरव करण्यात येते.

तथापि, बदलत्या काळानुसार आणि क्रीडा क्षेत्रातील वाढत्या स्पर्धेनुसार, या योजनेचा पुनर्विचार करून ती अधिक सर्वसमावेशक, तर्कसंगत आणि खेळाडू-केंद्रित बनवणे आवश्यक आहे. यानुषंगाने मा.उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३० सप्टेंबर, २०२५ रोजी झालेल्या बैठकीत केंद्र शासन आणि इतर क्रीडा-प्रगत राज्यांच्या धर्तीवर महाराष्ट्राची रोख पारितोषिक योजना अद्ययावत करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय यांच्याकडून संदर्भाधीन दि.१७.१०.२०२५, दि.१६.१२.२०२५ व दि.१६.०६.२०२६ रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासन स्तरावर झालेल्या विविध बैठकीतील निर्देशानुसार आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांनी संदर्भाधीन दिनांक १४.०८.२०२६ रोजीच्या पत्रान्वये सुधारीत प्रस्ताव सादर केला. सदर प्रस्तावास मा. मंत्रिमंडळाने दि.२४.०८.२०२६ रोजीच्या बैठकीत मान्यता दिली आहे.

यानुषंगाने राज्यातील आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पदक प्राप्त खेळाडू व त्यांचे क्रीडा मार्गदर्शक यांना रोख बक्षिस देवून गौरविण्याच्या योजनेत सुधारणा करून रोख बक्षिस देण्याची कार्यनियमावली सुलभ व्हावी यास्तव, वाचा येथील अ.क्र. २ ते ७ पर्यतचे शासन निर्णय अधिक्रमीत करुन, सर्वसमावेशक शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय : -**

आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर वैयक्तिक/सांघिक क्रीडा प्रकारात उल्लेखनीय कामगिरी करुन महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल करणाऱ्या राज्यातील पदक प्राप्त खेळाडू व त्यांचे क्रीडा मार्गदर्शक यांना रोख बक्षिस देवून गौरविण्याबाबतचे संदर्भाधीन वाचा येथील अ.क्र. २ ते ७ व यापूर्वीचे सर्व शासन निर्णय अधिक्रमीत करून खालीलप्रमाणे सुधारित धोरण ठरविण्यात येत आहे.

**२. राज्यातील आंतरराष्ट्रीय पदक प्राप्त खेळाडू व त्यांचे क्रीडा मार्गदर्शक यांना रोख बक्षिस देऊन गौरविण्यात येणाऱ्या योजनेची कार्यपद्धती खालीलप्रमाणे आहे :-**

१ **:- शीर्षक:** सदर योजनेस राज्यातील आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पदक प्राप्त खेळाडू आणि त्यांचे क्रीडा मार्गदर्शक यांना रोख बक्षिस देवून गौरविण्याची सुधारीत योजना असे संबोधण्यात येईल.

२ **:- उद्दिष्टे :-**

i. आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करुन राज्याचे नाव उज्ज्वल केलेल्या राज्यातील खेळाडू व त्यांच्या मार्गदर्शकांना प्रोत्साहनपर बक्षिस देवून त्यांचा गौरव करणे व त्यांना प्रोत्साहित करणे.

ii. आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर पदक जिंकणाऱ्या खेळाडूंना देशातील सर्वोत्तम पारितोषिक रक्कम देऊन त्यांना प्रोत्साहन देणे आणि राज्यातील क्रीडागुणांना आकर्षित करणे.

iii. खेळाडूंची कठोर मेहनत, समर्पण आणि त्यांच्या यशात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या क्रीडा मार्गदर्शकांच्या योगदानाचा यथोचित सन्मान करणे.

iv. पुरस्कारांच्या वितरणासाठी एक पारदर्शक, गतिमान आणि कालबद्ध प्रशासकीय यंत्रणा निर्माण करणे, ज्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा (ऑनलाईन पोर्टल) वापर करणे.

३. **व्याप्ती :-**

३.१ **लागू असलेल्या स्पर्धा:** या शासन निर्णयातील परिच्छेद २ मधील अ.क्र.६ मध्ये तक्तानिहाय नमूद सर्व स्पर्धामध्ये पदक मिळवणारे खेळाडू आणि त्यांचे मार्गदर्शक पात्र असतील:

३.२ **लागू असलेले खेळ:** या शासन निर्णयातील परिच्छेद २ मधील अ.क्र.६ मध्ये तक्तानिहाय नमूद केल्यानुसार खेळ तसेच कबड्डी, खो-खो, बुद्धीबळ, मल्लखांब, योगासन व क्रीकेट हे खेळ या योजनेसाठी पात्र असतील.

४. **परिभाषा /व्याख्या :**

i. **खेळाडू:** महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) धारण करणारी कोणतीही व्यक्ती, जी पात्र स्पर्धेत भारताचे किंवा महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करते.

ii. **क्रीडा मार्गदर्शक:** ५.२ मध्ये नमूद केलेल्या पात्रतेनुसार आणि खेळाडूने स्पर्धेपूर्वी अधिकृतपणे घोषित केलेला मार्गदर्शक.

iii. **सांघिक खेळ:** ज्या खेळात दोन किंवा अधिक खेळाडू एकत्रितपणे सांघिक कामगिरीच्या आधारावर पदक जिंकतात, उदा. रिले, दुहेरी/मिश्र दुहेरी,कबड्डी, फुटबॉल, हॉकी इत्यादी.

iv. **अधिकृत स्पर्धा:** संबंधित खेळाच्या आंतरराष्ट्रीय किंवा राष्ट्रीय स्तरावरील अधिकृत महासंघाद्वारे अथवा त्यांनी मान्यता प्रदान केलेल्या प्राधिकरणाद्वारे आयोजित केलेली स्पर्धा.

५. **पात्रता निकष आणि सर्वसाधारण अटी:-**

५.१. **खेळाडूंसाठी पात्रता:**

**अधिवास:** खेळाडू महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे अनिवार्य आहे आणि त्याकरिता अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. १८ वर्षाखालील खेळाडूंच्या बाबतीत, त्यांच्या पालकांचे अधिवास प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाईल.

**राज्य प्रतिनिधित्व:** राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा अथवा राष्ट्रीय एकविध खेळ क्रीडा स्पर्धांमध्ये (National Games /National Single Games Competition or Championship) खेळाडूने महाराष्ट्र राज्याचे

प्रतिनिधित्व करणे बंधनकारक आहे. इतर राज्यांकडून खेळणारे महाराष्ट्राचे रहिवासी खेळाडू या योजनेसाठी पात्र नसतील.

**शासकीय/सार्वजनिक उपक्रम नोकरी:** केंद्र शासन, भारतीय रेल्वे, संरक्षण दल किंवा इतर सार्वजनिक उपक्रमांमध्ये नोकरी करणारे आणि महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र असलेले खेळाडू, जर त्यांनी पात्र आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारताचे प्रतिनिधीत्व करुन प्राविण्य संपादन केले असेल, तर ते या योजनेअंतर्गत रोख पारितोषिकासाठी पात्र असतील.

वरीलप्रमाणे पात्र खेळाडूने रोख पारितोषिक बक्षिसासाठी क्रीडा व युवक सेवा संचालनालयाकडे ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक.

**५.२. क्रीडा मार्गदर्शकांसाठी पात्रता :**

**i. अधिवास:** खेळाडूने सूचविलेल्या मार्गदर्शकांपैकी मूळ मार्गदर्शक महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

**ii. पात्रता :** क्रीडा मार्गदर्शकांनी खालील नमूद केलेली पात्रता धारण केलेली असावी.

क्रीडा मार्गदर्शक स्वत: राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय खेळाडू अथवा राज्य/केंद्र शासनाकडून पुरस्कार प्राप्त असणे आवश्यक.

***किंवा***

क्रीडा मार्गदर्शक एनआयएस कोर्स /सर्टिफिकेट कोर्स/डिप्लोमा कोर्स

***किंवा***

संबंधित एकविध खेळाच्या संघटनेद्वारे आयोजित क्रीडा मार्गदर्शक अ, ब, क, ड लेव्हल कोर्स.

***किंवा***

राज्य/केंद्र शासनामार्फत क्रीडा मागदर्शकांना देण्यात येणारा पुरस्कार.

**iii. स्पर्धेपूर्वी नोंदणी:** खेळाडूंनी कोणत्याही पात्र स्पर्धेत सहभागी होण्यापूर्वी आपल्या अधिकृत क्रीडा मार्गदर्शकाचे नाव क्रीडा व युवक सेवा संचालनालयाकडे 'एक-वेळ नोंदणी' (One-Time Registration) प्रक्रियेद्वारे नोंदवणे आवश्यक असेल.

**iv. एकापेक्षा जास्त मार्गदर्शक:** खेळाडूने एकापेक्षा जास्त (कमाल तीन) मार्गदर्शकांची नावे प्रस्तावित केल्यास, पारितोषिकाची रक्कम त्यांच्यात समान विभागली जाईल.

प्रशिक्षक/प्रशिक्षकांच्या गटाला देय असलेले रोख प्रोत्साहन हे पदक विजेत्या खेळाडूने केलेल्या शिफारसी आणि ऑनलाईन अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारे ठरवले जाईल. वैयक्तिक स्पर्धांमधील पदक विजेत्यांशी संबंधित प्रशिक्षकांना मिळणाऱ्या रोख प्रोत्साहनाचे वाटप तक्ता-ड मधील श्रेणींनुसार आणि निर्दिष्ट प्रमाणात केले जाईल.

v. सांघिक खेळातील खेळाडूंचे मार्गदर्शक खेळाडू निहाय वेगवेगळे असल्यास खेळाडूंना प्रदान करण्यात येणा-या रकमेच्या दहा टक्के रक्कम त्या-त्या खेळाडूच्या मार्गदर्शकांना प्रदान करण्यात येईल.

**५.३: सांघिक खेळांसाठी पारितोषिक गणना:**

सांघिक खेळांमध्ये प्रत्येक खेळाडूचे योगदान महत्त्वाचे असते. त्यामुळे, वैयक्तिक खेळाच्या तुलनेत सांघिक खेळासाठी एकूण पारितोषिक रक्कम जास्त असेल, जी संघातील खेळाडूंमध्ये विभागली

जाईल. यासाठी अर्जुन पुरस्काराच्या धर्तीवर स्वीकारण्यात आलेले गुणोत्तर प्रमाण वापरले जाईल, जे राष्ट्रीय स्तरावर प्रमाणित आणि तर्कसंगत मानले जाते.

**सांघिक खेळासाठी पारितोषिक वितरणाचे सूत्र:-**

- **२ खेळाडूंचा संघ:** वैयक्तिक पारितोषिक रकमेच्या १.५ पट, जी दोन्ही खेळाडूंमध्ये समान विभागली जाईल.
- **३-४ खेळाडूंचा संघ:** वैयक्तिक पारितोषिक रकमेच्या २ पट, जी सहभागी खेळाडूंमध्ये समान विभागली जाईल.
- **५-१० खेळाडूंचा संघ:** वैयक्तिक पारितोषिक रकमेच्या ३ पट, जी सहभागी खेळाडूंमध्ये समान विभागली जाईल.
- **१० पेक्षा जास्त खेळाडूंचा संघ:** वैयक्तिक पारितोषिक रकमेच्या ५ पट, जी सहभागी खेळाडूंमध्ये समान विभागली जाईल.
- सहभागी खेळाडू निश्चित करतांना राखीव खेळाडूंचा समावेश करण्यात येईल.

उदा.: कबड्डी विश्वचषक स्पर्धांमध्ये भारतीय संघाला सुवर्ण पदक प्राप्त झाल्यास कबड्डी खेळातील संघाची सदस्य संख्या १२ असल्यास या संघातील महाराष्ट्राच्या खेळाडूंना द्यावयाच्या रोख पारितोषिकाची गणना पुढील प्रमाणे करण्यात येईल :

( खालील क्र.६.१ मधील तक्ता-ब येथील अ.क्र.१ येथील नमूद रक्कम रु.१०० लक्ष x ५ पट /सदस्य संख्या (१२) = ५००/१२= ४१.६६ लक्ष इतकी रक्कम त्या संघातील महाराष्ट्राच्या खेळाडूस देय ठरेल.)

टिप:-सांघिक खेळामध्ये वरील प्रमाणे परिगणित होणारी रक्कम ०.०१ लक्ष व त्यावरील रक्कम पुढील लक्ष रुपयांमध्ये परिगणित करण्यात येईल. उदा.: वरील प्रमाणे ४१.०१ लक्ष ही रक्कम पुढील ४२.०० लक्ष अशी परिगणित करण्यात येईल.

**५.४: जागतिक अजिंक्यपद/विश्वचषक स्पर्धा:**

जागतिक स्पर्धांचे महत्त्व त्यांच्या आयोजनाच्या वारंवारतेवर अवलंबून असते. चार वर्षातून एकदा होणारी स्पर्धा ही वार्षिक स्पर्धेपेक्षा अधिक प्रतिष्ठेची असते. त्यामुळे, केंद्र शासनाच्या धोरणाप्रमाणे, पारितोषिक रक्कम स्पर्धेच्या वारंवारतेनुसार निश्चित केली जाईल.

- **स्तर १ (चार वर्षांतून एकदा):** मूळ रकमेच्या १००%.
- **स्तर २ (दोन वर्षांतून एकदा):** मूळ रकमेच्या ५०%.
- **स्तर ३ (वार्षिक):** मूळ रकमेच्या २५%.
- उपरोक्त प्रमाणे आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी रकमा निश्चित करतांना खालील ५.५ मधील किमान सहभागाची अट लागू राहील.

**५.५ : आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी किमान सहभाग अट:**

आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये कांही स्पर्धांमध्ये कांही विवक्षित प्रकरणांमध्ये विविध देशांच्या संघाचा अथवा खेळाडूंचा सहभाग कमी प्रमाणात असतो, स्पर्धेत किती देशांनी किंवा खेळाडूंनी सहभाग घ्यावा, ही बाब खेळाडूंच्या कक्षेबाहेरील असून, अशा वेळी अशी स्पर्धा खेळतांना किमान सहभागाच्या अटीवर खेळाडूंना पारितोषिक रक्कम नाकारणे हा खेळाडूंवर अन्याय ठरतो, यामुळे केंद्र शासनाच्या धर्तीवर सहभागी देशांच्या

अथवा खेळाडूंच्या प्रमाणात पारितोषिकाची रक्कम अवलंबून असेल, त्याचे परिगणना सूत्र खालील प्रमाणे असेल.

- **सूत्र: प्राविण्य प्राप्त केलेल्या क्रीडा प्रकारात** (Event)

| **रोख पारितोषिक रक्कम** | **सांघिक क्रीडा प्रकार** | **वैयक्तिक क्रीडा प्रकार** |
|---|---|---|
| १००% (पूर्ण) | नमूद स्पर्धांमध्ये किमान १२ देशांचा सहभाग असावा | नमूद स्पर्धांमध्ये किमान १६ देशांचा सहभाग असावा. |
| ५०% (निम्मी) | नमूद स्पर्धांमध्ये ६ ते ११ देशांचा सहभाग असल्यास | नमूद स्पर्धांमध्ये किमान ८ ते १५ देशांचा सहभाग असल्यास |
| २५% (एक चतुर्थांश) | नमूद स्पर्धांमध्ये ४ किंवा ५ देशांचा सहभाग असल्यास | नमूद स्पर्धांमध्ये किमान ४ ते ७ देशांचा सहभाग असल्यास |
| **चार पेक्षा कमी देशांचा सहभाग असल्यास रोख पारितोषिक देय ठरणार नाही.** | | |

**६. पुरस्काराचे स्वरूप:-** आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्पर्धेत पदक प्राप्त खेळाडू व त्यांच्या मार्गदर्शकांना त्यांच्या कामगिरीनुसार खालीलप्रमाणे रोख पारितोषिक देण्यात येईल:-

**६.१ तक्ता अ: सर्वसाधारण गटातील स्पर्धा** (Able Bodied Sports)

**पात्र खेळ :** खालील नमूद स्पर्धांमध्ये त्या-त्या वर्षी आयोजित होणारे खेळ पात्र राहतील)

| **अ.क्र.** | **स्पर्धेचे नाव** | **संपादन केलेले पदक व रोख पारितोषिक रक्कम (₹ . लाखात)** | | |
|---|---|---|---|---|
| | | **सुवर्ण** | **रौप्य** | **कांस्य** |
| १ | ऑलिंपिक खेळ (उन्हाळी व हिवाळी) | ५००.०० | ३००.०० | २००.०० |
| २ | आशियाई खेळ (Asian Games) | १००.०० | ७५.०० | ५०.०० |
| ३ | राष्ट्रकुल खेळ (Commonwealth Games) | १००.०० | ७५.०० | ५०.०० |
| ४ | राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा (National Games) | ७.०० | ५.०० | ३.०० |
| ५ | खेलो इंडिया योजनेंतर्गत आयोजित सर्व प्रकारच्या स्पर्धा (Khelo India Games-All Editions) | ३.०० | २.०० | १.०० |

**तक्ता ब: सर्वसाधारण गटातील स्पर्धा** (Able Bodied Sports)

**पात्र खेळ :** खालील नमूद स्पर्धांमध्ये सन-२००५ नंतर सलग तीन (समर) ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये आयोजित झालेले खेळ आणि कबड्डी, खो-खो, मल्लखांब, योगासन, बुद्धीबळ व क्रिकेट हे खेळ पात्र राहतील.

| अ.क्र. | स्पर्धेचे नाव | संपादन केलेले पदक व रोख पारितोषिक रक्कम (₹ . लाखात) | | |
|---|---|---|---|---|
| | | सुवर्ण | रौप्य | कांस्य |
| १ | जागतिक अजिंक्यपद/विश्वचषक स्पर्धा (४ वर्षातून एकदा) | १००.०० | ७५.०० | ५०.०० |
| २ | जागतिक अजिंक्यपद/ विश्वचषक स्पर्धा (२ वर्षातून एकदा) | ५०.०० | ३०.०० | २०.०० |
| ३ | जागतिक अजिंक्यपद/ विश्वचषक स्पर्धा (वार्षिक) / ऑल इंग्लंड बॅडमिंटन | २५.०० | २०.०० | १५.०० |
| ४ | आशियाई अजिंक्यपद (४ वर्षातून एकदा) | ५०.०० | ३०.०० | २०.०० |
| ५ | आशियाई अजिंक्यपद (२ वर्षातून एकदा) | २५.०० | १५.०० | १०.०० |
| ६ | आशियाई अजिंक्यपद (वार्षिक) | १५.०० | १०.०० | ५.०० |
| ७ | जागतिक विद्यापीठ खेळ (World University Games) | १०.०० | ७.०० | ५.०० |

**तक्ता क: पॅरा गटातील स्पर्धा (Para Sports)**

**पात्र खेळ** : खालील नमूद स्पर्धांमध्ये त्या-त्या वर्षी आयोजित होणारे खेळ पात्र राहतील)

| अ.क्र. | स्पर्धेचे नाव | संपादन केलेले पदक व रोख पारितोषिक रक्कम (₹ . लाखात) | | |
|---|---|---|---|---|
| | | सुवर्ण | रोप्य | कांस्य |
| १ | पॅरा ऑलिम्पिक गेम्स (उन्हाळी व हिवाळी) (या स्पर्धेत त्या-त्या वर्षी समाविष्ट सर्व खेळ पात्र राहतील) | ५००.०० | ३००.०० | २००.०० |
| २ | पॅरा एशियन गेम्स (वरिष्ठ गट) (या स्पर्धेत त्या-त्या वर्षी समाविष्ट सर्व खेळ पात्र राहतील) | १००.०० | ७५.०० | ५०.०० |

**तक्ता ड: पॅरा गटातील स्पर्धा** (Para Sports)

**पात्र खेळ** : खालील नमूद स्पर्धांमध्ये सन-२००५ नंतर सलग तीन समर ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये आयोजित झालेले खेळ आणि कबड्डी, खो-खो, मल्लखांब, योगासन, बुद्धीबळ व क्रिकेट हे खेळ पात्र राहतील.

| अ.क्र. | स्पर्धेचे नाव | संपादन केलेले पदक व रोख पारितोषिक रक्कम (₹ . लाखात) | | |
|---|---|---|---|---|
| | | सुवर्ण | रोप्य | कांस्य |
| १ | आयपीसी वर्ल्ड कप / वर्ल्ड चॅम्पियनशिप/एशियन चॅम्पियनशिप (वरिष्ठ गट)<br>• दर चार वर्षांनंतर आयोजित होणाऱ्या अधिकृत स्पर्धा साठी १००% रक्कम | २०.०० | १५.०० | १०.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | • दर दोन वर्षांनंतर आयोजित होणाऱ्या अधिकृत स्पर्धा साठी ५०% रक्कम<br>• दर वर्षांनंतर आयोजित होणाऱ्या अधिकृत स्पर्धा साठी २५% रक्कम | | | |
| २ | पॅरा वर्ल्ड गेम्स /आयपीसी वर्ल्ड कप / पॅरा वर्ल्ड चॅम्पियनशिप (वरिष्ठ गट)<br>• दर चार वर्षांनंतर आयोजित होणाऱ्या अधिकृत स्पर्धा साठी १००% रक्कम<br>• दर दोन वर्षांनंतर आयोजित होणाऱ्या अधिकृत स्पर्धा साठी ५०% रक्कम<br>• दर वर्षांनंतर आयोजित होणाऱ्या अधिकृत स्पर्धा साठी २५% रक्कम | १०.०० | ७.०० | ५.०० |

**तक्ता इ: डेफ़, अंध, स्पेशल इ. गटातील स्पर्धा:**

**पात्र खेळ** : खालील नमूद स्पर्धांमध्ये त्या-त्या वर्षी आयोजित होणारे खेळ पात्र राहतील.

| अ.क्र. | स्पर्धेचे नाव | संपादन केलेले पदक व रोख पारितोषिक रक्कम (₹ . लाखात) | | |
|---|---|---|---|---|
| | | सुवर्ण | रौप्य | कांस्य |
| १ | डेफ ऑलिम्पिक | ४०.०० | ३०.०० | २०.०० |
| २ | आयबीएसए वर्ल्ड चॅम्पियनशिप /वर्ल्ड कप/ वर्ल्ड गेम्स | ३०.०० | २०.०० | १०.०० |
| ३ | अंध क्रिकेट वर्ल्ड कप | ३०.०० | २०.०० | १०.०० |
| ४ | विशेष ऑलिम्पिक/वर्ल्ड गेम्स फॉर मेन्टली चॅलेन्जड (उन्हाळी व हिवाळी) | ४०.०० | ३०.०० | २०.०० |
| ५ | डेफ वर्ल्ड चॅम्पियनशिप/वर्ल्ड कप (वरिष्ठ गट) | ३०.०० | २०.०० | १०.०० |
| ६ | वर्ल्ड अबिलिटी स्पोर्टस् गेम्स/ वर्ल्ड अबिलिटी बीच गेम्स. | ३०.०० | २०.०० | १०.०० |

**तक्ता- ई कनिष्ठ (युथ व ज्युनिअर) गटाच्या स्पर्धा :-**

**पात्र खेळ** : खालील नमूद स्पर्धांमध्ये सन-२००५ नंतर सलग तीन समर ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये आयोजित झालेले खेळ आणि कबड्डी, खो-खो, मल्लखांब, योगासन, बुद्धीबळ व क्रिकेट हे खेळ पात्र राहतील.

| अ.क्र. | स्पर्धा प्रकार | संपादन केलेले पदक व रोख पारितोषिक रक्कम (₹ .लाखात) | | |
|---|---|---|---|---|
| | | सुवर्ण | रौप्य | कांस्य |
| १ | युथ ऑलिम्पिक व युथ पॅरा ऑलिम्पिक (दर चार वर्षांनंतर आयोजित होणाऱ्या अधिकृत स्पर्धा) | ५०.०० | ३०.०० | २०.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | युथ कॉमनवेल्थ गेम्स/ युथ एशियन गेम्स (दर चार वर्षांनंतर आयोजित होणाऱ्या अधिकृत स्पर्धा) | २०.०० | १५.०० | १०.०० |
| ३ | ज्युनिअर वर्ल्ड चॅम्पियनशिप / पॅरा ज्युनिअर वर्ल्ड चॅम्पियनशिप | १०.०० | ७.०० | ५.०० |
| ४ | ज्युनिअर वर्ल्ड कप/पॅरा ज्युनिअर वर्ल्ड कप | १०.०० | ७.०० | ५.०० |
| ५ | ज्युनिअर एशियन चॅम्पियनशिप/पॅरा ज्युनिअर एशियन चॅम्पियनशिप | ५.०० | ३.०० | २.०० |
| ६ | ज्युनिअर कॉमनवेल्थ चॅम्पियनशिप/ पॅरा ज्युनिअर कॉमनवेल्थ चॅम्पियनशिप | ५.०० | ३.०० | २.०० |

i. वरील नमूद केलेली रोख पारितोषिके, अन्यथा निर्दिष्ट केल्याशिवाय, दर चार वर्षांनी आयोजित केल्या जाणा-या स्पर्धांसाठी आहेत.
ii. द्विवार्षिक क्रीडा स्पर्धासाठी दिल्या जाणारी पारितोषिक रक्कम, दर चार वर्षांनी आयोजित केल्या जाणा-या स्पर्धांसाठी दिल्या जाणा-या पारितोषिक रकमेच्या निम्मी (५०%) असेल.
iii. वार्षिक क्रीडा स्पर्धांसाठी दिली जाणारी पारितोषिक रक्कम, दर चार वर्षांनी आयोजित केल्या जाणाया स्पर्धांसाठी दिल्या जाणा-या पारितोषिक रकमेच्या एक चतुर्थांश (२५%) असेल.
iv. आंतरराष्ट्रीय पॅरालिम्पिक समितीद्वारा आयोजित नसलेल्या, परंतु त्यांच्या अधिकृततेने सक्षम खेळाडूंसाठी स्पर्धा आयोजित करणा-या महासंघाने अशा स्पर्धा आयोजित केल्यास या स्पर्धा देखील रोख पारितोषिक योजनेंतर्गत पात्र राहतील, मात्र अशा क्रीडा प्रकारांचा समावेश पॅरालिम्पिक खेळामध्ये असणे आवश्यक आहे.
v. पॅरा खेळाडूंसोबत खेळणारे, स्पर्धा करणारे सर्वसाधारण खेळाडू या रोख पारितोषिकांसाठी पात्र ठरणार नाहीत. तथापि, डेफ ऑलिम्पिक स्पर्धेतील खेळाडूंसोबत खेळणारे/स्पर्धा करणारे सर्वसाधारण खेळाडू रोख पारितोषिकांसाठी पात्र राहतील.

vi. वरील नमूद आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत एखाद्या खेळाडूने वैयक्तिक किंवा सांघिक अथवा वैयक्तिक व सांघिक प्रकारात एकापेक्षा अधिक पदके संपादन केली असल्यास, त्या खेळाडूने संपादन केलेल्या प्रत्येक पदकासाठी रोख पारितोषिक देय ठरेल.

vii. युवा आणि कनिष्ठ गटातील खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी युथ ऑलिम्पिक, युथ कॉमनवेल्थ गेम्स आणि ज्युनियर वर्ल्ड चॅम्पियनशिप यांसारख्या स्पर्धा पात्र राहतील.

### ६.२ तक्ता ड: मार्गदर्शकांसाठी (Coaches) रोख पारितोषिक वितरण (३०:३०:४० सूत्र)

खेळाडूंच्या रोख पारितोषिक रकमेच्या एकूण १०% टक्के रक्कम संबंधित खेळाडूने प्रमाणित केल्यानुसार क्रीडा मार्गदर्शकांना विविधस्तरानुसार मार्गदर्शन केल्यानुसार विभागून देण्यात येईल.

| श्रेणी | पारितोषिक सूत्र | शेरा |
|---|---|---|
| पायाभूत स्तर (Grassroot) | ३०% | प्राथमिक प्रशिक्षण देणारे. |
| विकासात्मक स्तर (Developmental) | ३०% | कौशल्य विकास व मध्यंतरी प्रशिक्षण देणारे. |
| उच्च स्तर (Elite) | ४०% | अंतिम व प्रगत प्रशिक्षण देणारे. |

६.३. **विशेष स्पर्धा**:- बॅडमिंटन, टेनिस व हॉकी मध्ये आयोजित होणा-या विशेष स्पर्धांसाठी खालील प्रमाणे पारितोषिक रक्कम देय राहील.

**अ) बॅडमिंटन स्पर्धा :**

| अ.क्र. | स्पर्धा प्रकार | संपादन केलेले पदक व रोख पारितोषिक रक्कम (लाखात) | |
|---|---|---|---|
| | | विजयी खेळाडू | उपविजयी खेळाडू |
| १ | थॉमस कप / उबर कप/सुदीरमन कप (दर दोन वर्षानंतर आयोजित होणाऱ्या ) | ४०.०० | २०.०० |

**ब) टेनिस स्पर्धा :**

| अ.क्र. | स्पर्धा प्रकार | संपादन केलेले पदक व रोख पारितोषिक रक्कम(लाखात) | |
|---|---|---|---|
| | | विजयी खेळाडू | उपविजयी खेळाडू |
| १ | टेनिसमधील चारही ग्रॅण्ड स्लॅम स्पर्धा | ३००.०० | २००.०० |

**क) हॉकी :**

| अ.क्र. | स्पर्धा प्रकार | संपादन केलेले पदक व रोख पारितोषिक रक्कम (लाखात) | |
|---|---|---|---|
| | | विजयी खेळाडू | उपविजयी खेळाडू |
| १ | अझलन शाह कप (वरिष्ठ गट) | ४०.०० | २०.०० |
| २ | चॅम्पियन्स ट्रॉफी | ४०.०० | २०.०० |
| ३ | सुलतान जोहर कप (कनिष्ठ गट) | २०.०० | १०.०० |

## ३. सर्वसाधारण तरतुदी (General Provisions)

३.१ या योजनेअंतर्गत रोख प्रोत्साहनासाठी पात्र असलेल्या क्रीडा स्पर्धांमध्ये नव्याने क्रीडा स्पर्धांचा समावेश करणे, बदल करणे किंवा काढून टाकण्याचे अधिकार मा. मंत्रिमंडळास राहतील.

३.२ या योजनेअंतर्गत दिले जाणारे रोख प्रोत्साहन हा कोणताही कायदेशीर हक्क (Legal Right) नाही. या योजनेअंतर्गत येणाऱ्या बाबींविषयी आणि त्याच्या अर्थाबाबत (Interpretation) महाराष्ट्र शासनाचे सर्व

निर्णय अंतिम आणि बंधनकारक असतील. अशा निर्णयांविरुद्ध कोणतेही अपील, आव्हान किंवा दावा करण्यास परवानगी दिली जाणार नाही.

३.३ या योजनेतील कोणत्याही तरतुदीच्या अर्थाबाबत कोणतीही संदिग्धता, वाद किंवा संघर्ष निर्माण झाल्यास, शासनाचा निर्णय अंतिम आणि बंधनकारक असेल.

३.४ कोणतेही सष्टीकरण किंवा पूर्वसूचना देण्याचे बंधन न ठेवता, ही योजना आपल्या स्वेच्छेनुसार स्थगित करण्याचे, गोठवण्याचे किंवा बंद करण्याचे अधिकार शासन राखून ठेवत आहे.

४. **रोख पारितोषिक मंजूर करण्याचे अधिकार:-** वर दर्शविलेल्या कामगिरीची पडताळणी करुन संबंधित खेळाडूस रोख पारितोषिक मंजूर करण्याचे अधिकार शासनास राहतील.

५. **आहरण व संवितरण अधिकारी:-** या योजनेसाठी आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे.

६. राज्यातील खेळाडूने आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेमध्ये पदक प्राप्त केल्यानंतर त्याबाबतची माहिती संबंधित एकविध खेळाच्या राज्य संघटनेने पदक प्राप्तीच्या प्रमाणपत्रासह आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे १५ दिवसाच्या कालावधीत देण्याची व्यवस्था करावी. याशिवाय राज्यातील आंतरराष्ट्रीय पदकप्राप्त खेळाडूंची अद्ययावत माहिती प्रसार माध्यमाद्वारे प्रकाशित होणारी वृत्ते तसेच इंटरनेटद्वारे उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी क्रीडा व युवक सेवा संचालनालयातील जबाबदार अधिका-याकडे सोपवावी.

७. स्पर्धेमध्ये पदक प्राप्त केलेल्या राज्यातील खेळाडूची माहिती प्राप्त झाल्यावर त्या खेळाडूस राज्य शासनाच्यावतीने अभिनंदन करणारे पत्र आयुक्त, क्रीडा व युवकसेवा, पुणे यांच्या स्वाक्षरीने आठ दिवसांच्या कालावधीत पाठविण्यात यावे व त्या पत्राची प्रत शासनास पाठविण्यात यावी.

८. सदर शासन निर्णय मा. मंत्रिमंडळाच्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे. तसेच या शासन निर्णयातील तरतुदी शासन निर्णयाच्या दिनांकानंतर होणाऱ्या स्पर्धांना लागू राहतील.

९. खेळाडूंना रोख पारितोषिक देण्याच्या योजनेकरिता होणारा खर्च "२२०४-क्रीडा व युवकसेवा-(०९) (०६) ऑलिम्पिक, राष्ट्रकुल व आशियाई स्पर्धामधील पदक विजेत्यांना रोख पारितोषिके देणे (२२०४ ५३२१) - ५० इतर खर्च" या लेखाशीर्षाखाली टाकण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०९१७११३३४५१७४२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by SHITAL ANAND RAMTEKE
Date: 2026.10.05 13:30:27 +05'30'

**(शितल रामटेके)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव

२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,

३. मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास विभाग व गृहनिर्माण) यांचे प्रधान सचिव
४. मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांचे सचिव,
५. मा. अध्यक्ष /उपाध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव,
६. मा.सभापती/उपसभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव,
७. मा.विरोधी पक्षनेता,विधानसभा /विधानपरिषद, यांचे स्वीय सहायक, मुंबई.
८. सर्व मा. विधानपरिषद/ विधानसभा सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई
९. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक
१०. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग,मंत्रालय, मुंबई,
११. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१२. सचिव, नियोजन विभाग,मंत्रालय, मुंबई,
१३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
१४. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
१५. आयुक्त, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१६. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे,
१७. निवड नस्ती (क्रीयुसे-२).